# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): वाशिम    P.S. (पोलीस ठाणे): वाशिम    Year (वर्ष): 2024

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0457    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 02/08/2024 23:21 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): शुक्रवार    Date from (दिनांक पासून): 02/08/2024    Date To (दिनांक पर्यंत): 02/08/2024

Time Period (कालावधी): प्रहर ६    Time From (वेळेपासून): 16:08 तास    Time To (वेळेपर्यंत): 16:21 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 02/08/2024    Time (वेळ): 22:00 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 052    Date and Time (दिनांक आणि वेळ): 02/08/2024 22:57 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): उत्तर, 2 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): नगरपरिषद वाशिम,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)

6.

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.कृष्णा डिगंबरराव देशपांडे

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1974

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रास्वराज कॉलनी सिव्हील लाईन, वाशिम, वाशिम, वाशिम, महाराष्ट्र-444505, भारत |
| 2 | स्थायी पता | रास्वराज कॉलनी सिव्हील लाईन, वाशिम, वाशिम, वाशिम, महाराष्ट्र-444505, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल क्र.):** 91-9850126161

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | वैभव देविदास पांडे | | | 1. Town/Village (शहर / गाव): राहनुमान नगर,एसआरपीएफ कॅम्प,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): हिंगोली शहर,District (जिल्हा): हिंगोली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

या वेळी सफौ 522 यांनी कलमं 7 भ्रष्ट्राचार पर्तिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायमी करविलीफिर्याद लाप्रवि वाशिम.दिनांक:-02/08/2024नाव- श्री.कृष्णा डिगंबरराव देषपांडे वय 50 वर्शे,व्यवसाय-वेदांत अँटोमोबाईल पुसद नाका वाशिम रा.स्वराज कॉलनी सिव्हील लाईन वाशिम ता.जि.वाशिम मो.नं.9850126161 (एअरटेल मी वरील ठिकाणी कुंटुबासह राहतो व पुसद नाका वाशिम येथे वेदांत अँटोमोबाईल नावाने व्यवसाय करतो, दिनांक 01/08/2024 रोजी मी लाचलुचपत

प्रतिबंधक विभाग वाशिम कार्यालयात जावून पोलीस उपअधिक्षक गजानन आर शेळके, लाप्रवि वाशिम यांचे कडे लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे." मी अँन्टी करप्शन ब्युरो वाशिम येथे येऊन समक्ष तक्रार देतो की,मी वरील ठिकाणी परीवारासह राहतो. पुसदनाका वाशिम येथे वेदांत अँटोमोबाईल चे दुकान चालवितो.माझे शिक्षण 12 वी पर्यंत झाले असुन मला लिहीता व वाचता येते. नगर परीषद ने पुसदनाका वाशिम येथे महात्मा गांधी विद्यालयाजवळ 3 मजली व्यापारी संकुल बांधलेले आहे. सदर संकुलामधील मध्यम मजल्यावरील (अप्पर ग्राऊंड फ्लोअर)दुकान नं.23 हे श्री.सुधाकर नारायण संगवार रा.गोंदेश्वर काळे फाईल वाशिम यांचे नांवे असुन सदर दुकान त्यांनी नगर परीशद वाशिम कडून 30 वर्षाकरीता भाडे तत्वावर घेतलेले आहे. सदर दुकान सुधाकर संगवार यांचे कडून भाडे तत्वावर घेण्याचा त्यांचेत व माझी पत्नी सौ.पुर्वा कृष्णा देशपांडे यांच्यात लेखी करार झाला आहे. सदर दुकान माझी पत्नी सौ.पुर्वा कृष्णा देशपांडे हिचे नांवावर भाडे तत्वावर करण्याकरीता रितसर प्रस्ताव,विंनती अर्ज तसेच करारनामा तयार करुन नगर परीषद वाशिम येथे दि.29.07.2024 रोजी दाखल केला आहे.तसेच दुकानाचा मार्च 2025 पावेतोचा टॅक्स तसेच दुकानाचे मार्च 2024 पावेतोचे भाडे भरलेले आहे. सदरच्या पावत्या घेवुन दुकान माझी पत्नी सौ.पुर्वा कृष्णा देशपांडे हिचे नावावर करण्याकरीता 15000/-रु शासकिय फि आहे. सदरची आवश्यक असलेली फि भरण्याकरीता मी दि.31.07.2024 रोजी नगर परीषद वाशिम येथील श्री.वैभव पांडे मिळकत विभाग प्रमुख यांना भेटलो असता, त्यांनी मला दुकान नावावर करण्याकरीता 15000/-रु पावती व्यतिरिक्त 10,000/-रु लागतील असे सांगीतले. मी त्यांना सांगीतले कि,मी आवश्यक असलेली सर्व शासकिय फि,टॅक्स भरलेला आहे.त्यांनी मला सांगीतले कि, दुकान तुमच्या पत्नीचे नावावर करायचे असेल तर 10,000/-रु दयावे लागतील. माझी पत्नी सौ.पुर्वा कृष्णा देशपांडे आणि सुधाकर संगवार यांचा दुकान हस्तांतरणाचा आर्थिक व्यवहार झाला आहे तसेच दुयम निबंधक विभाग येथे भाडे पटयाची नोंद करण्याकरीता नगर परीषद वाशिम ची ट्रान्सफर पावतीची आवश्यकता असल्यामुळे नाईलाजास्तव मी श्री.वैभव पांडे मिळकत विभाग यांना 10,000/-रु देण्याचे कबुल केले आहे.त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नाही. श्री.वैभव पांडे मिळकत विभाग, नगर परीषद वाशिम यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुष्मनी नाही. श्री.वैभव पांडे मिळकत विभाग, नगर परीशद वाशिम यांच्यावर कार्यवाही करावी या करीता तक्रार देत आहे. कारवाही होण्यास विनंती आहे."मी वरील प्रमाणे लेखी तक्रार दिली. त्यानंतर पोउपअधि गजानन शेळके यांनी मा.अधिक्षक अभियंता, सवंसु, मंडळ म.रा.वि.वि.कंपणी मर्या.वाशिम येथुन दोन पंच कर्मचारी उपलब्ध करुन घेतले. मी, पंच कर्मचारी यांना माझी तक्रार सांगितली. तसेच पंच कर्मचारी यांनी मी, दिलेली लेखी तक्रार वाचली. वैभव देविदास पांडे, सहा.मिळकत व्यवस्थापक, मिळकत विभाग, नगर परीषद वाशिम यांची प्रत्येक्ष भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावी लागेल असे पोउपअधि गजानन शेळके लाप्रवि वाशिम यांनी मला सांगितले. वैभव पांडे नगर परीषद वाशिम यांचे सोबत माझी नगर परिषद वाशिम येथे भेट होणार असल्याने पोलीस उपअधिक्षक गजानन शेळके यांनी दोन्ही पंच, स्टाफ व मला पडताळणी कारवाई संबंधी सुचना दिल्या. सदर तक्रारीवरुन दि.01/08/2024 रोजी मला, व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देऊन पंच क्र.1 यांचेसह वैभव पांडे मिळकत विभाग, नगर परीषद वाशिम यांची भेट घेवून त्यांची पडताळणी करणेकरीता पाठवून पंचासमक्ष पडताळणी केली असता, माझी नगर परिषद वाशिम येथे वैभव पांडे यांचे सोबत भेट होवून बोलनी झाली. मी वैभव पांडे

यांना बोललो की, एकदा दयानं माझं काम करुन...त्यावर त्यांनी तुम्हाला काय अपेक्षीत आहे ते विचारले वर मी त्यांना पावती कितीची आहे असे विचारल्यावर वैभव पांडे म्हणाले पंधरा हजाराची वर दहा हजार रुपये दयावे लागतील मी त्यांना म्हटले कमीजास्त होत नाही का काही त्यावर थोडे बोलुन तडजोडी अंती वैभव पांडे यांनी सात हजार रुपये पावती व्यतेरिक्त लाचेची मागणी केली आहे मी तात्काळ सापळा कारवाई पथक यांना भेटून सविस्तर हकिकत सांगीतली. वैभव पांडे यांनी लगेच पैसे घेवुन बोलाविले असल्याने पोउपअधि गजानन शेळके यांनी मला, वैभव पांडे यांना लाच म्हणुन देण्याकरीता 7,000/-रूपये व पावतीचे 15,000 रुपये असे एकुण 22,000 रुपये हजर करण्यास सांगितले असता मी लाच रक्कमेसाठी 500/-रूपये दराच्या 14 नोटा व पावती करीता लागणा-या रक्कमेच्या 500/- रुपये दराच्या 30 नोटा अशा एकुण 500/- रुपये दराच्या 44 नोटा एकुण 22,000/-रूपये हजर केले. सदरची संपुर्ण रक्कम हि माझे व्यवसायातुन मिळालेल्या बचती मधील आहे. मी रक्कम हजर केल्यानंतर वैभव पांडे यांना लाच म्हणुन दयायचे रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. पोउपअधि गजानन शेळके यांनी सापळा कार्यवाही संबधी सर्वांना सुचना दिल्या. अँल्ट्राव्हायोलेट लॅम्पचा प्रयोग करून दाखविले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र.1 यांचे सह रवाना करण्यापुर्वी पोउपअधि गजानन शेळके यांनी मला वैभव पांडे यांना फोन करुन ऑफिस मध्ये आहे का विचारण्यास सांगीतले, मी वैभव पांडे यांना फोन केला परंतु त्यांनी सांगीतले की, ते बाहेर असुन नंतर फोन करतो काही वेळाने परत त्यांना फोन केल्यावर त्यांनी सांगीतले की, ते बाहेरगावी निघाले असुन उदया भेटु अशी माहिती मी पोउपअधि गजानन शेळके यांना दिल्यावर सर्वानुमते सापळा कारवाई उदया दिनांक 02/08/2024 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 02/08/2024 रोजी ठरल्याप्रमाणे मी लाप्रवि वाशिम कार्यालय येथे हजर आलो तेव्हा कार्यालयात पोउपअधि गजानन शेळके, स्टाफ व पंच हजर होते. पोउपअधि गजानन शेळके यांनी परत मला व सर्वांना सापळा कारवाई संबंधाने सुचना दिल्या त्यानंतर पोउपअधि गजानन शेळके हयांनी वैभव पांडे कार्यालयात हजर आहे का हयाबाबत फोन करुन विचारुन घ्या असे सांगीतल्यावरुन मी वैभव पांडे हयांना फोन केला असता त्यांनी ते जिल्हाधिकारी कार्यालयात आहेत, नगर परिषद कार्यालयात पोहचल्यावर फोन करतो असे सांगीतले काही वेळानंतर परत फोन केला असता त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातच आहो असे सांगीतले शेवटी अंदाजे 16.00 वा दरम्यान त्यांचा नगर परिषद कार्यालयात पोहचल्याचा फोन आल्यानंतर 16.08 वा दरम्यान व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र.1 यांचे सह मला वैभव पांडे यांना लाच रक्कम देण्याकरीता नगर परिषद वाशिम येथे पाठविले. त्याप्रमाणे नगर परिषद वाशिमचे परिसरात पंचासह सापळा कारवाईसाठी एसीबी स्टाफ दबा धरुन बसले. नगर परिषद वाशिम चे आत मधील वैभव पांडे यांच्या ऑफिस मध्ये गेलो तिथे त्यांचेत व माझे मध्ये संभाशण झाले. वैभव देविदास पांडे, सहा.मिळकत व्यवस्थापक, मिळकत विभाग, नगर परीषद वाशिम यांना मी पावती विषयी बोलणी केली त्यानंतर पैसे देण्यासाठी त्यांनी इषारा केल्यावरुन ठरल्याप्रमाणे वैभव पांडे यांनी माझे कडुन लाच रक्कम 7,000 रुपये व पावतीचे 15,000 रुपये असे दोन्ही मिळुन एकुण 22,000 रुपये स्विकारल्याने मी ठरल्याप्रमाणे पोउपअधि.गजानन शेळके लाप्रवि वाशिम यांना माझे फोनवरुन त्यांच्या फोनवर मिस कॉल करुन लाच रक्कम स्विकारल्याचा इषारा केला. पोउपअधि गजानन शेळके व स्टाफ यांनी येऊन वैभव पांडे यांचे कडून लाचेची रक्कम पंचासमक्ष जप्त करुन त्यांना ताब्यात घेतले. वैभव देविदास पांडे वय- 32 वर्षे,

व्यवसाय-नोकरी,सहा.मिळकत व्यवस्थापक, मिळकत विभाग, नगर परीषद वाशिम रा.हनुमान नगर, एसआरपीएफ कॅम्प जवळ हिंगोली जि.हिंगोली यांनी नगर परिषद वाशिम मार्फत पुसद नाका वाशिम येथील महात्मा गांधी विद्यालया जवळ बांधलेल्या 3 मजली व्यापारी संकुला मधील दुकान हे माझी पत्नी नामे सौ.पुर्वा कृष्णा देशपांडे यांचे नावावर रजिष्टर भाडे पटा करण्याकरीता नगर परिषद कडुन ट्रान्सफर पावती देण्याकरीता पावती चे 15,000 रुपया व्यतेरीक्त 7,000 रुपयाची लाचेची मागणी करुन स्वतः लाच रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद पो.हवा.विनोद मारकंडे लाप्रवि वाशिम यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचून पाहली, माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष सही

(गजानन आर शेळके) ( श्री.कृष्णा डिगंबरराव देशपांडे )
पोलीस उपअधिक्षक, रा.स्वराज कॉलनी सिव्हील लाईन वाशिम
ता.जि.वाशिम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Devendrasinh Bahadursinh Thakur (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

ASI Cowls
522
स्टे.डा.अंमलदार
पो.स्टे.वाशिम (शहर)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Devendrasinh Bahadursinh Thakur

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):